ज्योति सन्तानो,

नमस्कार ! ॐ नमो नारायणाय !

प्रत्येक मनुष्य को कर्तव्य पालन करना होता है। माता-पिता की आज्ञा का पालन करो। तुम्हारी प्यारी माँ तुम्हें रोज खिलाती है और सब प्रकार से तुम्हें आराम पहुँचति है। उससे प्रेम करो। उसका आदर करो। वह जो कहे, उसे पूरा मन लगा कर करो तथा उसे प्रसन्न रखो। पिता का भी कहना मानो। अपने पूज्य पिता का भी आदर करो। वह तुम्हारे लिए धन कमाते हैं। माता-पिता दोनों तुम्हारा खयाल रखते हैं। तुम्हारे लिए वे भगवान् हैं, जिनका दर्शन तुम स्वयं कर सकते हो।

अपना पाठ अच्छी तरह याद करो। अपने शिक्षकों की आज्ञा का पालन करो और उनका आदर करो। यह भी तुम्हारा कर्तव्य है। अपनी पढ़ाई पूरी करने के बाद अपनी मातृभूमि की सेवा करो। गरीबों का दुःख दूर करो। यह भी तुम्हारा कर्तव्य है।

बड़ों का आदर करो। पड़ोसियों की सेवा करो। प्रतिदिन तीन बार प्रार्थना और सन्ध्या करो। जीवन के विभिन्न क्षेत्रों में तुम अपने कर्तव्यों का पालन जितनी कुशलता से करोगे, उतना ही तुम्हारा जीवन सफल होगा।

- स्वामी शिवानन्द



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- एप्रिल महिन्याचा सत्संग १९ एप्रिल रोजी डॉ. आनंद राव यांच्या घरी झाला.
- एप्रिल महिन्याचा अंक सर्व सदस्यांना वितरीत केला गेला.
- डॉ. आनंद यादव यांनी दिव्य जीवन संघाच्या पुणे शाखेला १०,००० रुपयांची देणगी दिली. शाखा त्यांची कृतज्ञ आहे.

❀ **पुणे शाखेचा पत्ता** ❀

**श्री. गो. आ. नगरकर**
'स्वानंद' एस्. २०
सहजीवन सोसायटी
पर्वती, पुणे ४११००९
☎ ९३७०५७०२०६

**श्री. नितीन देशपांडे**
'ईशावास्य'
प्लॉट नं. ४९ /सायंतारा,
डी. एस. के. विश्व
धायरी, पुणे ४११०४१
☎ ०९८५०९३१४१७
०९८५०८२६९९०

पुस्त डाक

प्रति



# दिव्य जीवन





(दिव्य जीवन संघ, पुणे शाखा)
(ज्ञानयज्ञ म्हणून वितरित)
वर्ष १० । अंक ५
मे २०१५

स्वामी शिवानंद सरस्वती

स्वामी चिदानंद सरस्वती

## बाल विशेषांक

गुरुदेवांनी सांगितलेली गोष्ट -

एक किनई, राजा होता हं, खूप मोठा आणि खूप प्रेमळ. त्याचं होतं, एक छानसं मांजर ! गोरं गोरं आणि गुबगुबीत. राजाचं फार लाडकं. मांजर राजाच्या सगळ्या आज्ञा ऐकायचं. तंतोतंत पाळायचं ! राजा त्याच्या डोक्यावर दिवा ठेवायचा आणि त्या उजेडात आपलं काम करायचा. त्याचं काम होईपर्यंत मांजर शांत बसून रहायचं. राजा मंत्र्यांना म्हणायचा, ''बघा, तुमच्यापेक्षा हे मांजर जास्त शहाणं आहे. कामात मला मदत करतं.'

एकदा मात्र मंत्र्यांनी ठरवलं, राजाला दाखवून देऊ त्याला वाटतं तितकं काही मांजर शहाणं नाही. म्हणजे तो आपल्याला चिडवणार नाही.

मंत्र्यांनी काय केलं, ३-४ उंदीर पकडले. राजा

मांजराच्या डोक्यावर दिवा ठेवून काम करीत होता. मंत्र्यांनी तेव्हाच ते उंदीर मांजरासमोर सोडले. मग काय ? मांजर धावलं उंदराच्या मागे. दिवा पडला... तेल सांडलं...वात विझली... पण मांजराला त्याचं काय ?

मंत्री राजाला म्हणाले, ''बघा महाराज ! उंदीर दिसले नव्हते, तोवर तुमचं मांजर शहाणं होतं. उंदीर पाहिल्यावर ते मूळ स्वभावावर आलं.'' राजाला हे पटलं. त्यानं मंत्र्यांना चिडवण सोडून दिलं.

आपल्या मनाचंही असंच असतं हं. आपण खूप ठरवतो, 'आता छान पुस्तकं वाचेन, सारखे कार्टून बघणार नाही.' 'घरी नीट जेवेन. बाहेरचा खाऊ मागणार नाही.' पण हे सगळं समोर आलं, की विसरतो. पुन्हा हट्ट करतो. आपल्या खट्याळ मनाला आपणच शिस्त लावायला हवी. म्हणजे टी.व्ही. बघेन, पण आईने सांगितलं की लग्गेच बंद करेन. बाहेरचा खाऊ कधीतरीच खाईन. सारखा नाही. असं ! जमेल ?


नक्की जमेल ! करून तर बघा.

(समोर विषय - वस्तू नसताना मन शांत असतं. त्यांच्या संपर्कात आलं, तर अशांत होतं. म्हणून तप, तितिक्षेची काठी सतत हातात हवी असं मोठ्या माणसांना सांगणारी ही गोष्ट, 'गुरुदेवांनी सांगितलेल्या गोष्टी' या पुस्तकातील आहे. मूळ इंग्रजी पुस्तकाचे अनुवादक आहे - श्री. भ. रा. नाईक आणि सौ. चारुशीला नाईक)


(हिंग्लिश भाषा आज आपल्या सवयीची आहे. या हिंदी + इंग्लिश भाषेत खूप पूर्वी स्वामीजी भजन गात. तसंच एक मजेशीर भजन -)

कम हिअर, माय डिअर कृष्ण कन्हाई
मैंने तेरे लिए हृदय अंदर बिल्डिंग बनाई...
तेरे लिये बहुत सारा खाना बनाई
दूध - दही - बटर - मिस्री सारा मंगाई
कम सून, कम सून कृष्ण कन्हाई
मैंने तेरे लिए हृदय अंदर बिल्डींग बनाई
तेरे लिए रोज रोज आँसू बहाई
कम टू माय हाऊस तुझे आरती दिखाऊँ
व्हाय लेट सो लेट करते कन्हाई
मैंने तेरे लिए हृदय अंदर बिल्डिंग बनाई !

- स्वामी शिवानंद सरस्वती.



## शब्दों को खोजिए



अक्षरों के इस जंगल में निम्नांकित शब्दों को खोजिए भगवान्, प्रेम, पत्ते, पशु, पक्षी, पेड़-पौधों, ज्ञान, रास्ता, संसार, करुणा, सहानुभूति, भावनाएँ, प्रसारित, मित्रता, दया, योग, परमात्मा, एकत्व, विज्ञान, शान्ति, आनन्द, शक्ति

निवेदन

परमपूज्य स्वामी चिदानंद सरस्वतींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने पुणे-शाखेतर्फे आध्यत्मिक सहल काढण्याचे ठरले आहे. मे महिन्यामध्ये ३० व ३१ तारखेला स्वामी शिवानंदांच्या श्रेष्ठ शिष्या ॐ मालती देवी यांचा म्हैसाळ येथील आश्रम व श्रेष्ठ शिष्य स्वामी प्रणवानंद सरस्वती यांचे बावची येथील ध्यान-मंदिर या दोन प्रमुख स्थानांना भेट देण्याचे ठरले आहे. अधिक व सविस्तर माहितीसाठी -
संपर्क - ९८५०८२६९९०/९८५०९३१४१७